


# कोविड - 19
# आणि भारतीय अर्थव्यवस्था




...क:
अशोक पी. टिपरसे
पाटील निळकंठराव


2020-21




9 788195 050000

SIDDHI
PUBLISHING HOUSE
(National Publication)
Nanded, Maharashtra (India)
website : www.wiidrj.com

# कोवीड -19 आणि
# भारतीय अर्थव्यवस्था

:: संपादक ::

**डॉ. अशोक पी. टिपरसे**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर कॉलेज, देगलूर, जि. नांदेड.
सदस्य, व्यवस्थापन परिषद, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**डॉ. पाटील निळकंठराव**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड.

---

**SIDDHI PUBLISHING HOUSE**
NANDED – 431605.

**ISBN No.: 978-81-950500-0-0**

डॉ. अशोक पी. टिपरसे, मो. ९४२२५८०१२९
डॉ. पाटील निळकंठराव, मो. ९८३४३२२९५४

**प्रकाशक**

सिद्धी पब्लिकेशन,

मारोती मंदिराजवळ,

भावसार चौक, तरोडा खु. नांदेड

मो. 9623979067

ईमेल – shrishprakashan2009@gmail.com

*

**अक्षर जुळवणी**

डॉ.राजेश गंगाधरराव उंबरकर

umbarkar.rajesh@yahoo.com

*

**मुद्रक**

अनुपम प्रिंटर्स

श्रीनगर, नांदेड. मो. 9175324437

*

**प्रथम आवृत्ती**

**२७ फेब्रुवारी २०२१**

किंमत १००/- रु

सर्व अधिकार संपादकाकडे

**(या संपादीत पुस्तकातील शोधपेपर व लेखातील मत स्वत: संशोधकाचे वैयक्तिक मत आहे. त्यास संपादक व प्रकाशक हे सहमत असतीलच असे नाही. या ग्रंथातील कोणताही संदर्भ पूर्व परवानगी शिवाय प्रयुक्त करु नये .)**

# संदेश



विसाव्या शतकातील आर्थिक महामंदी आणि दुसऱ्या महायुदधानंतर प्रथमच आज जगातील मानवाला एक मोठया संकटाचा सामना करावा लागत आहे. जगातील जवळ जवळ प्रत्येक देश कोरोना महामारीचा शिकार बनला आहे. आज संपूर्ण जग हा अनिश्चितेतून जात असून कोरोना महामारीने जगातील अर्थव्यवस्थेला मोठया धोक्यात आणले आहे.

कोरोना महामारीच्या काळात शेती उद्योग आणि सेवा क्षेत्राचा पाया उध्वस्त झाला आहे, या कारणामुळेच जगातील अनेक राष्ट्रांचे जीडीपीचा (स्थूल राष्ट्रीय उत्पादन) आकडा हा ऋणात्मक स्वरूपाचा झालेला दिसून येतो, त्यास भारत हा अपवाद राहिलेला नाही. या अनिश्चित काळामध्ये अर्थव्यवस्थेला या संकटातून बाहेर काढण्यासाठी आर्थिक आणि वित्तीय धोरणात्मक उपायाची आवश्यकता आहे. की ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था या महामारीच्या संकटातुन बाहेर पडेल. आणि सुधारित समावेशक अर्थव्यवस्थेच्या नव्या चेहऱ्याला जन्म देईल. इतर जगातील राष्ट्राच्या तुलनेत भारतीय लोकसंख्या पाहता भारताने या कोरोना महामारीच्या प्रसारावर प्रतिबंध घालण्यास्त अद्यापपर्यंतत चांगले व्यवस्थापन केले आहे.

कोरोनाचा भारतात सर्व देशभर सामाजिक आणि आर्थिक घटकावर अनिष्ट परिणाम झाला आहे. याचा परिणाम म्हणून सामान्य जनजीवन विस्कळीत होऊन त्यांच्यापुढे आज आरोग्य, शिक्षण, रोजगार स्थलांतर इत्यादी प्रकारच्या जटील समस्या निर्माण झाल्या आहेत. कोरोना महामारीमुळे निर्माण झालेल्या जटील प्रश्नावर धोरणात्मक उपाय करणे आवश्यक असून यासाठी संशोधक संशोधक विद्यार्थी, अभ्यासक यांचे लेखच्या स्वरुपातील योगदान महत्वाचे ठरते.

संपादित पुस्तकाच्या विविध भागातील अभ्यासक आणि संशोधकांनी कोरोनाच्या महामारीवर आपले कल्पक आणि धोरणात्मक लेख सादर केले आहेत, मी त्यांचे अभिनंदन करतो. तसेच या पुस्तकाचे संपादक डॉ. अशोक टिपरसे आणि डॉ. निळकंठ पाटील यांनी या महामारीतून बाहेर पडण्यासाठी या लेखकांचे विचार एकत्रित करुन प्रकाशित करण्यासाठी जे परिश्रम आणि प्रयत्न केले आहे त्यांचे मी कौतूक करतो.

- **डॉ. उध्दव भोसले**

कुलगुरू

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, महाराष्ट्र.

# पुनरावलोकन समिती
## (Review Committee)

**डॉ. संतोष कदम**
संतोष पाटील महाविद्यालय, मंद्रूप,
अध्यक्ष व्यवसायीक अर्थशास्त्र अभ्यास मंडळ,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**डॉ. अविनाश शेंद्रे**
प्रगती कला आणि वाणिज्य महाविद्यालय, डोंबिवली,
सदस्य अर्थशास्त्र अभ्यास मंडळ,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. शाजी सहदेवान**
राष्ट्र माता इंद्रा गांधी कला, विज्ञान आणि वाणिज्य
महाविद्यालय, जालना.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | संशोधीत पेपर व लेखाचे नांव | लेखकाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1. | कोवीड -19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे संभाव्य परिणाम | डॉ. आर. एस. वानखेडे | 9 |
| 2. | कोविड-१९ चा भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम | प्रा. डॉ.सर्जेराव गंगाधर गोल्डे | 14 |
| 3. | कोव्हिड-19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम | डॉ. राजेश्री अप्पाराव जाधव | 20 |
| 4. | कोविड-१९ चे भारतीय अर्थव्यवस्थेतील निवडक क्षेत्रावर झालेले परिणाम | प्रा. देविदास गोकुळ गवळी | 28 |
| 5. | कोविड-१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम - एक दृष्टिकोण | प्रा. डॉ. शालिनी उत्तमराव कदम | 36 |
| 6. | कोविड-१९ चा शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम : एक अभ्यास | प्रा. डॉ. रामदास मुक्टे | 43 |
| 7. | कोविड-१९ नंतरची देशातील आर्थिक परिस्थिती - एक दृष्टिक्षेप | डॉ. प्रदीप साहेबराव जाधव | 49 |
| 8. | कोरोणा-भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | डॉ.डी.डी.चौधरी | 54 |
| 9. | कोविड-19चे महाराष्ट्रातील बांधकाम कामगारावर झालेला परिणाम | डॉ. शिवाजी पाते गंगाधर लक्ष्मणराव गायकवाड | 67 |
| 10. | कोविड-19 चा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम | प्रा. पवार अविनाश विलासराव | 73 |
| 11. | कोरोना आणि भारतीय अर्थव्यवस्था | प्रा.डॉ. एस.बी पाते कु. पल्लवी दाजी वाघ | 80 |
| 12. | कोविड १९ पश्चात भारतीय अर्थव्यवव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या संधी | डॉव्यंकटेश मदनुरे . काळुराम | 85 |

| | | | |
|---|---|---|---|
| 13. | कोविड–19 आणि भारतातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक | प्रा.डॉ.शेळके मदन लक्ष्मण | 89 |
| 14. | कोविड - १९ चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम-एक दृष्टिक्षेप | डॉ. पलमटे माधव पांडुरंगराव | 95 |
| 15. | कोविड -१९ चा भारतीय शिक्षणावरील परिणाम | प्रा. डॉ. रेणुकादास य. बोनर | 99 |
| 16. | भारतीय संतांच्या भूमिकेतून वर्तमान अर्थचक्र | डॉ. रवींद्र बेम्बरे | 109 |
| 17. | कोरोनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम | प्रा. डॉ. अशोक टिपरसे | 112 |
| 18 | Covid – 19 चे बँकिंग क्षेत्रावर झालेले परिणाम | प्रा. सोमनाथ सर्जेराव विभुते | 117 |
| 19. | Covid – 19 मुळे जागतिक अर्थव्यवस्थेवरील परिणाम | डॉ. राजेश गं. उंबरकर | 124 |


# कोवीड -19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे संभाव्य परिणाम

- डॉ. आर. एस. वानखेडे

कोवीड-19 या महासाथीच्या रोगाचे जगभर परिणाम झालेले दिसून येतात. भारतीय अर्थव्यवस्था देखील त्यापासून दूर राहू शकत नाही. भारतामध्ये देखील याच्या तीन शक्यता वर्तवण्यात येत आहेत.

1. कोवीड19 नंतरचे व आधीचे जग संपूर्णपणे वेगळे असेल.
2. चीनमधील विकसित देशांनी आपली गुंतवणूक काढून घेतली तर सत्ता संबंधाची नवी संरचना उदयास येईल.
3. जागतिक राजकारणातील आकांक्षा पूर्ण होण्याच्या दृष्टीने भारताला हनुमान उडी मारण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे.

एवढे मात्र निश्चित असेल की कोवीड-19 नंतरचे जग प्रचंड बदललेले असेल मात्र हे बदल नेमके कोणते असतील, यात कोणत्या वर्गाचा व देशाचा सर्वाधिक फायदा होईल आणि समाजातील कोणते वर्ग होऊ घातलेल्या बदलांमध्ये भरडले जावू शकतात यावर फारशी चर्चा होताना दिसत नाही. एवढे मात्र निश्चित आहे की, कोवीड-19 मुळे व त्यामुळे आलेल्या लॉकडाऊनमुळे हातावर पोट भरणाऱ्या लोकांचे मात्र हाल होताना दिसत आहेत. स्थलांतरीत कामगारांचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. बँकांची अनुत्पादक मालमत्ता वाढण्याची भीती निर्माण झालेली आहे. विकास दर शुन्यावर येण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. या सर्व परिणामांचा आढावा सदर लेखामध्ये घेण्यात आलेला आहे.

अध्ययनाची उद्दिष्टे :

1. कोवीड -19 मुळे होणाऱ्या आर्थिक विकासावरील परिणामाचा अभ्यास करणे.
2. कोवीड -19 बेरोजगारीवर होणाऱ्या परिणमाचा अभ्यास करणे.
3. कोवीड -19 मुळे देशाच्या वित्तियतुटीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

# कोरोनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम

- प्रा. डॉ. अशोक टिपरसे

**प्रस्तावना**

सध्या जगभरात कोरोना विषाणूच्या साथीने थैमान घातले आहे. साथीत जगभरात आतापर्यंत लाखो लोकांचा मृत्यू झाला आहे. या साथीपुढे जगातील बलशाली सत्ता देखील हतबल झालेल्या दिसतात. अगदी सूक्ष्म स्वरुपातील या विषाणूने परिस्थिती चिंताजनक केली आहे. या साथीच्या वाढत्या प्रसारामुळे जगभरातील मानवी समूहाला जिवंत राहणे हीच आपली प्राथमिकता आहे हे अधोरेखित करायला भाग पाडले आहे. साथीच्या प्रकारातील या विषाणूचा प्रादूर्भाव जगभरातील अनेक श्रीमंतापासून ते गरीबांपर्यंत होताना दिसतो आहे.

वास्तविकता अशी आहे की, काही वर्षापूर्वी आलेला सार्स रोगही एक प्रकार होता. परंतु कोविड- १९ या नव्या विषाणूने संपूर्ण जगाला विळखा घातला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) अहवालानुसार १९० पेक्षा जास्त देशात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झालेला आहे. कोट्यावधी लोकांना याची लागण होऊन लाखोलोक मृत्यूमुखी पडले आहेत. भारतातही लाखो लोक कोरोनाच्या विळख्यात सापडले आहेत.

प्रस्तुत शोध निबंधात संशोधकाने कोरोनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम याचे अध्ययन केले आहे.

**संशोधनाचा उद्देश :**

१. कोरोनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.
२. कोरोनाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाचे अभ्यास करुन निष्कर्ष काढणे.

**गृहितकृत्ये :-**

कोरोनामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील वृध्दीदरावर परिणाम.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध द्वितियक सामग्रीवर आधारित आहे. तथ्य संकलनासाठी विषयाशी संबंधित विविध संदर्भ ग्रंथ क्रमिक पुस्तके, इंटरनेट,



प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, वर्तमानपत्रे व नियतकालिके इत्यादी माध्यमांचा वापर करण्यात आला आहे.

**कोरोनाचा अर्थव्यवस्थेवर परिणाम :**

या शतकातले सर्वात मोठे आर्थिक आव्हान विषाणूच्या रुपात जगासमोर टाकले आहे. आर्थिक पेलू सोबत या आव्हानाला सामाजिक कांगोरेही आहेत. त्यामुळे त्याचा प्रसार सिमित करण्यासाठी सध्या संपूर्ण जग लढत आह.

युनोच्या जागतिक व्यापार समितीच्या अंदाजानुसार, करोनामुळे चीनच्या औद्योगिक उत्पादन घट होणार असून जगातील आंतरराष्ट्रीय व्यापार एक ट्रीलियन म्हणजे एक हजार अब्ज डॉलरने कमी होणार आहे इतर संस्थानच्या अभ्यासानुसार कोरोनामुळे जगाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न (GDP) १.३० टक्क्याने घटणार आहे. युरोपचा ५०% GDP व्यापारातून येतो. त्यामुळे युरोपमध्ये मंदीची लाट येण्याची शक्यता वाढली आहे. याचबरोबर थेट विदेशी गुंतवणूकही ५ ते १५ % ने कमी होणार असून त्याचा फटका भारताला बसणार आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर २०१९ च्या शेवटच्या तीमाहित ४.७०% होता. आता कोरोना संसर्गाच्या भीतीने टाळेबंदी (लॉकडाऊन) झाल्यामुळे हा वृद्धी दर उणे होण्याची शक्यता आहे.

भारतातील २०.४४ दशलक्ष कामगार/ कर्मचारी हॉटेल उद्योगावर अवलंबून आहेत. म्हणजे एकूण रोजगाराच्या ५.७ % रोजगार या एकाच क्षेत्रात आहेत. याशिवाय हॉटेल उद्योगात ४० दशलक्ष अप्रत्यक्ष रोजगार मिळतो सध्या हे पूर्ण क्षेत्र दोलायमान अवस्थेत आहे. आणि लॉकडाऊनमुळे परिस्थिती आर्थिक बिकट होणार आहे`.

कोरोनाचा फटका आर्थिक बाजारावरही होणार आहे. घर, बँकींग, वित्तीय कंपन्या (NBFC) व बँका सध्या अडचणीत आहेत. कामगार / कर्मचारी बेकार झाले तर कर्जचुकवेगिरी सुरु होई. यामुळे अनेक छोटे/मोठे उद्योग हळूहळू बंद होतील.

कोरोनामुळे होणाऱ्या या तोट्यांची नुकसान भरपाई करण्यासाठी जगभरची सरकारे उद्योग / व्यापार क्षेत्रासाठी आर्थिक मदतीची पॅकेज जाहिर करत आहे. अमेरिकेचे पॅकेज १२०० अब्ज डॉलर, इग्लंडचे ३९ अब्ज, फ्रान्स ४५ अब्ज तर इटलीचे पॅकेज २८ अब्ज डॉलरचे आहे. या पार्श्वभूमीवर भारतानेही पॅकेज जाहीर करणे आवश्यक आहे. त्यासाठी या काही सुचना सरकारने लघु-उद्योग, छोटे

व्यवसायिक व घरगुती उपभोक्ता यांच्याकडून वीज, पाणी बिलाच्या वसुलीसाठी ३ ते ६ महिने मुदत द्यावी. मध्यम उद्योगासाठी प्राप्तीकर भरण्यासाठी ३ ते ६ महिने मुदत द्यावी. याचबरोबर सरकारने पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी २.५० लाख कोटी रुपयांचा निधी उभारावा. त्यात १ लाख कोटी सरकारचे असावे व बाकी आंतरराष्ट्रीय वित्त संस्थाकडून १० वर्षाकरिता कजाऊ घ्यावेत.

सध्याचे संकट पाहता सरकारने वित्तीय तुट, महसुली तुट, महागाई दर याकडे दुर्लक्ष करावे. या सर्व उपाययोजनामधून उभी झालेली रक्कम सरकाने कष्टकरी कामगार दारिद्रय रेषेखालील नागरीक व वीज व पाणीपुरवठा करणाऱ्या संस्थावर खर्च करावी.

रिझर्व्ह बँकेच्या व्याज दरात त्वरीत एक टक्का कपात करावी या सर्व NBFC व बँकांना, छोटे व्यावसायिक व लघुउद्योगांना त्वरीत कर्जपुरवठा करावा व वसुली ३ ते ६ महिन्यानंतर सुरुवात करावी.

सध्या देश अतिशय कठीण काळातून जात आहे. अशावेळी सरकारने अर्थव्यवस्थेला बळकट करण्याची संधी गमावली तर जनतेचे नुकसान होईलच पण शेअर बाजारही आस्थिर होईल व गुंतवणूकीवर परतावा मिळू शकणार नाही. पण कोरोनाच्या या संकटातही भारतासाठी काही संधी आहेत.

भारताला जागतिक व्यापारातील आपला वाटा या निमित्ताने २ टक्क्यापेक्षा अधिक वाढवता येईल. याविशाय रसायने, लोखंड व पोलाद आणि वाहनांचे सुटे भाग यावर भारताचे वर्चस्व आहे. लॉकडाऊन काळात जपान, अमेरिका व इतर देशातल्या शैक्षणिक संस्था बंद झाल्या आहेत. त्याचा लाभ घेऊन भारताला ई-लर्निंग व Delivery of Education Telemedicine या क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व सिध्द करणे सहज शक्य आहे.

आय. एम. एफ च्या म्हणण्यानुसार गेल्या १०० वर्षातली ही आर्थिक क्षेत्रातली सगळ्यात मोठी मंदी असणार आहे . १९२९ मध्ये जी महामंदीची (ग्रेट डिप्रेशन) स्थिती जगावर ओढवली होती. तेवढी गंभीर परिस्थिती जगावर ओढवून जगाची अर्थव्यवस्था कोलमंडून पडली. इकानॉमिक स्लोडाऊन, रिसेशन आणि डिप्रेशन यात फरक आहे. आपला जीडीपी वाढीचा दर कमी झाला आहे. (उदा. ८% वरून ७.५ % किवा ६.५% ) तर त्याला इकानॉमिक स्लोडाऊन असे म्हणतात. पण जेव्हा देशाचा जीडीपी वाढीचा दर निगेटिव्ह होतो म्हणजेच जीडीपी



चक्क कमी-कमी होत जातो. आणि तो ६ महिने टिकतो. तेव्हा रिसेशन आले असे म्हटले जाते `.

इकॉनॉमिक स्लोडाऊन, रिसेशन यापेक्षाही वाईट फेज म्हणज डिप्रेशन होय. जीडीपी वाढीचा दर १०% किंवा त्यापेक्षाही ३ वर्षापासून जास्त खाली जात असेल तर ता डिप्रेशन समजावा लागतो. हा डिप्रेशनचा अतिशय वाईट काळ १९२९ मध्ये आला आणि हा काळ जवळ जवळ १० वर्षे चालला. त्यावेळी जगाचा जीडीपी वाढीचा दर - १५% होता. बहुतांश कोरोनामुळे जगाची स्थिती १९२९ च्या ग्रेट डिप्रेशनसारखी होणार आहे.

**शिक्षण व्यवस्थेवर परिणाम :**

कोविड - १९ चा उच्च शिक्षणावर दूरगामी परिणाम होणार आहे. इंजिनिअरिंग व आर्किटेक्चरसाठी प्रवेश परीक्षेसाठी उशीर होणार आहे. प्रवेश परीक्षा न झाल्यास किंवा त्यास विलंब झाल्यास विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी लागणारी शैक्षणिक पात्रता आणि या संदर्भात शासकिय निर्णयाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच नोकरी गमावणे, वेतन कपात, टाळेबंदी, सेवा बंद होणे इत्यादी परिणामाना सामोरे जावे लागेल. आर्थिक क्षमता कमी झाल्यामुळे शैक्षणिक कर्ज घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढू शकते.

**निष्कर्ष :**

१. कोरोनाच्या वाढत्या प्रभावाने व वेळोवेळी लॉकडाऊनचा अवलंब केल्याने तो उणे २३.६ टक्के इतका ऋणात्मक झाला आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे फार मोठे नुकसान झाले आहे.

२. सर्वात जास्त परिणाम असंघटित क्षेत्रावर झालेला आहे.

३. देशातील उद्योग, पर्यटन गुंतवणूक, रियल स्टेट, बांधकाम व सरकारी महसूलावर परिणाम झाला आहे.

४. देशातील लोकांचे उत्पन्न व उत्पादन कमी झाल्यामुळे त्याचा मागणीवर परिणाम झाला आहे.

५. देशातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाबरोबर मोठे उद्योग ठप्प झाल्यामळे बाजारपेठा बंद पडून आर्थिक व्यवहारावर त्याचा परिणाम झालेला आहे.

**संदर्भ :**

१. जागतिक अर्थव्यवस्थेवर कोविड-१९ चा प्रभाव दै. लोकमत वर्तमान पत्र दि. ०१.०४.२०२० पृ. क्र. ४
२. साठे मधुसूदन : भारताच्या आर्थिक समस्या भाग - ५, आर्थिक सुधारणा आणि वाढ डायमण्ड पब्लिकेशन, पुणे इ ३०
३. दै. महाविदर्भ ६ एप्रिल २०२० पृ. क्र. ४
४. https:/economictics, indiatimes.com/ markets/news/ how-how-will-india-lokdown-play-out-for-economy-markets-४-scenarios/articleshow/ ७४८०८७. cms.
५. https:/economictics, indiatimes. com/news/economy/ inicators/ moodys- slashes - india -gdp - growth - in-२०२० - to - २ -५/ articleshow / ७४८४०४४६ cms.

**प्रा. डॉ. अशोक टिपरसे**
संशोधन मार्गदर्शक
अर्थशास्त्र विभागप्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर.